**नि.दि.दा.क्र.२३०/२०२३**

मारुती यशवंत सुतार

**विरुध्द**

अर्जुन यशवंत सुतार वगैरे २

## निशाणी क्र.२० खालील आदेश

वादी यांनी प्रतिदाव्यातील नमूद मिळकत विल्हेविक्री अथवा अन्य मार्गे हस्तांतरित करु नये अथवा त्यावर बोजा निर्माण होईल असे कोणतेही व्यवहार करु नयेत अशा आशयाचा तुर्तातूर्त मनाई आदेश पारित व्हावा अशी विनंती प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी उक्त अर्जान्वये केली आहे.

०२. **प्रतिदाव्यातील मिळकतीचे वर्णन –**

जिल्हा सांगली, तालुका मिरज पैकी मौजे मालगाव येथील गट क्र.२५५३, क्षेत्र ० हे. ९६ आर यासी चतुःसिमा पूर्वेस– मालगांव कळंबी रस्ता, पश्चिमेस– सुनिल कवठेकर यांची जमीन, दक्षिणेस– विलास निवृत्ती माळी (बोधगिरे) यांची जमीन व उत्तरेस– नेताजी साधू साळूंखे यांची शेतजमीन, ही मिळकत प्रतिदाव्याचा वादविषय आहे.

## अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

**०३.** वादी हे प्रतिवादी क्र.१ यांचे जेष्ठ बंधू असून प्रतिवादी क्र.२ ही वादी व प्रतिवादी क्र.१ व ३ यांची आई आहे. वादी व प्रतिवादी यांचे वडिल कै.यशवंत बाबू सुतार हे दिनांक ०२/०७/२००७ रोजी मयत झाले आहेत. कै.यशवंत हे

सुतारकी व्यवसाय व शेती व्यवसाय करीत होते. कै.यशवंत यांची मौजे मालगांव येथे गट क्र.८२२ क्षेत्र ० हे. ५४ आर ही वडिलार्जित शेतजमीन आहे. वादी, प्रतिवादी क्र.१ व त्यांचे वडिल कै.यशवंत तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ असे सर्वजण सन २००१ पर्यंत एकत्र कुटुंबात रहाणेस होते. वादी व प्रतिवादी यांनी एकत्रात असतांना गट क्र.८२२ मधील उत्पन्नातून व कै.यशवंत यांनी त्यांचे सुतार व्यवसायाच्या उत्पन्नातून दिनांक ३०/१०/१९९२ रोजी गट क्र.२५५३ ही मिळकत श्री. चंद्रकांत बाबासो पवार यांचेकडून रक्कम रु.४०,०००/– च्या मोबदल्यात खुषखरेदी घेतली आहे. खरेदीची रक्कम वादी, प्रतिवादी व त्यांचे वडिल कै.यशवंत बाबू सुतार यांनी साक्षीदार श्री.आण्णासाहेब रामू माळी व शरद शंकर जाधव यांचे समक्ष अदा केली आहे. वादी हा कै.यशवंत सुतार यांचा जेष्ठ मुलगा असल्याने हिंदू कुटुंबाचा सह हिस्सेदार या नात्याने सदरचे खरेदीपत्र खरेदी घेणार म्हणून वादी यांच्या नांवे नोंद करुन घेतले आहे. जरी सदरचे खरेदीपत्र वादी यांचे नांवे नोंद असले तरी सदरची जमीन वादी, प्रतिवादी व त्यांचे वडील कै. यशवंत यांनी एकत्र कुटुंबासाठी घेतली असून त्यामध्ये सर्वजण काबाडकष्ट करुन त्यातून मिळणारे उत्पन्न कौटुंबिक खर्चासाठी वापरत आले आहेत. वादी व प्रतिवादी तसेच कै.यशवंत सुतार यांनी जवाहर योजनेतून गट क्र.२५५३ या मिळकतीमध्ये विहिरीचे खोदकाम करुन घेतले आहे व त्यातून ते बागायत पिके घेत आले आहेत. त्यामुळे गट क्र.२५५३ ही मिळकत वादी यांच्या एकटयाच्या मालकीची नाही. सदर मिळकतीत वादी, प्रतिवादी तसेच कै.यशवंत यांचा हिस्सा व हक्कसंबंध आहे. कै. यशवंत यांच्या मृत्यूनंतर गट क्र.२५५३ या मिळकतीत वादी

व प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा आहे.

**०४.** गट क्र.२५५३ या मिळकतीची खरेदी व त्याच्या ७/१२ पत्रकी वादी यांच्या नांवे नोंद असल्याचा गैरफायदा घेऊन गट क्र.२५५३ ही मिळकत हडप करणेचा प्रयत्न वादी करीत आहे. प्रतिवादी यांनी वादी यांचेकडे गट क्र.२५५३ या मिळकतीमध्ये तुटक वाटप करुन मागितले असता वादी तुटक वाटप करुन देणेस तयार नाहीत. प्रतिवादी यांना वाटप करुन द्यावे लागू नये म्हणून वादी हे गट क्र.२५५३ ही मिळकत विल्हेविक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसेच दावा दाखल करतेवेळी गट क्र.२५५३ या मिळकतीचा समावेश केलेला नाही. त्यामुळे सदर मिळकतीचे वाटप होऊन मिळणेसाठी प्रतिवादींना प्रतिदावा दाखल करणे भाग पडले आहे.

**०५.** प्रतिदाव्याचा निकाल लागणेस बराच कालावधी लागणार असल्याने दरम्यानचे काळात वादी हे गट क्र.२५५३ या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी त्यांच्या एकटयाच्या नांवे नोंद असल्याचा गैरफायदा घेऊन सदरची मिळकत विल्हेविक्री किंवा अन्य मार्गे हस्तांतर करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसेच सदर जमिनीवर बोजा निर्माण करण्याचा प्रयत्न देखील वादीने केला आहे. गट क्र.२५५३ ही संपूर्ण शेतजमीन हस्तांतर केलेस अथवा त्या जमिनीवर बोजा निर्माण केलेस प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. प्रतिवादींना प्रथमदर्शनी केस असून, न्यायाचा समतोल देखील प्रतिवादींच्या बाजूने आहे. त्यामुळे वादीविरुध्द् तुर्तातूर्त

मनाई आदेश पारित करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०६.** वादी यांनी नि.क्र.२४ वर म्हणणे दाखल करुन अर्जातील कलम १ व २ मधील मजकूर अशंतः मान्य करुन अर्जातील इतर कथने नाकारली आहेत. वादीने विशेषतः असे कथन केले आहे की, वादी यांचा जन्म दिनांक ०१/०४/१९६२ रोजी झाला आहे. सन १९८५ साली वयाचे २३ व्या वर्षापासून वादी हे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेपासून विभक्त रहात आहेत. त्यावेळी वादी हे भारत सॉ मिल, सांगली येथे देखील सुतारकीचा व्यवसाय करीत होते व अदयाप देखील तोच व्यवसाय करतात. वादी यांचे प्रतिवादी क्र.१ ते ३ तसेच वडील यशवंत यांच्याशी वैचारिक मतभेद झाल्याने ते सन १९८५ पासून त्यांचेपासून विभक्त रहात आहेत. वादीने काबाड कष्ट करुन व पैशांची जुळवा–जुळव करुन गट क्र. २५५३ ही मिळकत दि. ३०/१०/१९९२ रोजी खरेदी घेतली आहे. त्यावेळी सदरची जमीन जिरायत होती म्हणून सन २००१ मध्ये वादीने जवाहर योजनेअंतर्गत विहीरीची खुदाई केली आहे. तेव्हापासून त्यामध्ये ऊस, सोयाबीन, मका यासारखे बागायत पिके घेत आहेत. त्यानंतर सन २०१७ पासून वादीने सदर मिळकतीमध्ये द्राक्ष बागेचे पिक केले आहे. सदर मिळकत सुपीक करणेकरिता व त्यामध्ये द्राक्ष बागेच्या लावणीकरिता वादीने विविध वित्तीय संस्थेकडून तसेच भु–विकास बँकेडून कर्जे घेऊन गुंतवणूक केली आहे. तसेच सन २०१५ साली वादीने सदर मिळकतीवर कर्ज काढून घर बांधून तेथे वास्तव्यास आहेत.

**०७.** सन १९८५ नंतर सुरुवातीस काही वर्षे वादीचे वडिल कै.यशवंत हे रेशनकार्ड क्र.१३१०१७ वरील मिळणारे धान्य व करोसीन वादीस देत होते. त्यानंतर वादीस शासकीय कार्यालयामध्ये व वित्तीय संस्थांमध्ये स्वतंत्र रेशनकार्डची गरज भासू लागल्याने वादीच्या वडिलांनी त्यांचे रेशनकार्डवरुन वादीचे नांव कमी करुन दिले व त्यानंतर वादीने स्वतःचे स्वतंत्र रेशनकार्ड तयार करुन घेतले आहे.

**०८.** सन २००७ साली वादीच्या वडिलांचा मृत्यू झालेनंतर वादीने प्रतिवादी यांचेकडे वडिलार्जित मिळकतीमध्ये सरस–निरस मानाने तुटक वाटप करुन मागितले असता प्रतिवादी हे वादीच्या गट क्र.८२२ मधील सामाईक वहिवाटीस हरकत अडथळा करु लागले. त्यावेळी वादीने प्रतिवादींवर कायदेशीर कारवाई करणार असल्याचे सांगितलेनंतर प्रतिवादींनी दिनांक २४/०१/२०१३ रोजी गट क्र.२५५३ मध्ये त्यांची देखील सामाईक मालकी वहिवाट सांगणारी खोटी नोटीस वादीस पाठविली. सदरची नोटीस दिनांक २४/०१/२०१३ रोजी वादीस मिळालेनंतर वादीने दिनांक १४/०२/२०१३ रोजी उत्तरी नोटीस पाठवून गट क्र.२५५३ ही वादीची स्वकष्टार्जित मालकी वहिवाटीची मिळकत असल्याचे व सदर मिळकतीमध्ये प्रतिवादींचा कब्जा/वहिवाट/हक्क/हितसंबंध नसल्याचे कळविले. सदर उत्तरी नोटीसीस प्रतिवादींनी कोणतीही प्रतिउत्तरी नोटीस वादीस पाठविली नाही अथवा कोणत्याही न्यायालयात दाद मागितली नाही. तेव्हापासून प्रतिवादी यांनी दावा कलम १/१ व १/२ दावा मिळकतींच्या

वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करणे बंद केले होते. मात्र त्यानंतर दिनांक ३१/०७/२०२३ रोजी प्रतिवादींनी संगनमताने वादीच्या अपरोक्ष दावा कलम १/१ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमधील वादीचे घर संसारोपयोगी साहित्यासह रातोरात जे.सी.बी.च्या सहाय्याने पाडून टाकले व त्याचदिवशी वादीविरुध्द कॅव्हेट दाखल केले आहे. त्याबाबत वादीने प्रतिवादींना जाब विचारला असता प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक ३१/०३/२०२१ रोजीच्या नोंदणीकृत दस्ताबाबतची  कल्पना वादीस दिली. सदरचा दस्त पाहिल्यानंतर वादीस असे समजले की, वादीस सन १९८५ च्या सुमारास तोंडी वाटपाने दावा कलम १/१ मधील नमूद मिळकतीपैकी प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस असलेले दक्षिण–पश्चिम कोप–यातील रोड लगतचे क्षेत्र प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना बोगस खरेदीपत्राने हस्तांतरित केले आहे. सदर खरेदीपत्राचे वेळी प्रतिवादींनी वादीच्या नावे नोंद असलेला ग्रामपंचायत मिळकतीचा उतारा वापरला आहे. त्यावेळी प्रतिवादींनी वादीची संमती घेतली नव्हती. सबब, वादीचे कब्जेतील घर मिळकत हडप करणेच्या उद्देशाने प्रतिवादींनी सदरचे बोगस खरेदीपत्र नोंदविले आहे.

**०९.** दावा कलम १ मधील नमुद मिळकतींमधील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादींनी हरकत अडथळा केल्याने वादीस वाटपासाठी प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडले आहे. वादीने प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीचे स्वकष्टार्जित मालकीचे गट क्र.२५५२ मध्ये

नसलेले हक्क प्रस्थापित करण्याकरिता प्रतिदावा केला आहे. वादी यांनी प्रस्तुत दावा मागे घ्यावा व दावा कलम १/१ व १/२ मधील नमुद मिळकतींमधील वादीचा हिस्सा हडप करणेकरिता प्रतिवादींनी वादीविरुध्द खोटा प्रतिदावा दाखल केला आहे. सबब, प्रतिदाव्यातील नमूद मिळकत ही वादीची स्वकष्टार्जित मिळकत असल्याने त्याबाबत कोणत्याही स्वरुपाची दाद प्रतिवादींच्या हक्कात देण्यात येऊ नये व प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

**१०.** प्रतिवादी व वादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही बाजूंची कथने तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूंचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे –

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | कोणाच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे ? | प्रतिवादींच्या. |
| २. | न्यायाचा समतोल कोणाच्या बाजूने आहे ? | प्रतिवादींच्या. |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास कोणाचे अपरिमित नुकसान होईल ? | प्रतिवादींचे. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## **का र ण मि मां सा**

**प्रश्नबिंदू क्र. १ ते ३ करीताः**

**११.** उपरोक्त प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विश्लेषण एकत्रीतरित्या केले आहे. प्रतिवादींनी त्यांचे हक्कात प्रथमदर्शनी केस सिध्द् केली आहे काय हे पाहण्याकरीता त्यांचे कथन तसेच त्यापुष्टयर्थ सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्यांचे अवलोकन करणे आवश्यक आहे. तसेच सदर कथनांना व कागदपत्रांना वादी यांनी प्रथमदर्शनी खंडनात्मक पुरावा सादर केला आहे का हे पाहणे देखील आवश्यक आहे. प्रतिवादी व वादी यांनी त्यांचे कथनांपुष्टयर्थ कांही कागदपत्रे सादर केली आहेत. आवश्यक त्या कागदपत्रांचा उल्लेख पुढे विश्लेषणादरम्यान केला आहे.

**१२.** प्रतिवादींचे कथन व युक्तिवादाप्रमाणे प्रतिदाव्यातील नमुद मिळकत गट क्र.२५५३ ही वादी, प्रतिवादी व त्यांचे वडिल कै. यशवंत यांनी वडिलार्जित मिळकत गट क्र.८२२ याच्या उत्पन्नातून तसेच कै.यशवंत यांनी सुतार काम व्यवसायातून मिळविलेल्या उत्पन्नातून खरेदी घेतली आहे. वादी हा मोठा मूलगा असल्याने त्याच्या नांवे गट क्र. २५५३ या मिळकतीचे खरेदीपत्र नोंदविण्यात आले आहे. वस्तुस्थितीप्रमाणे, सदर मिळकतीस केवळ वादी यांच्या नांवाची नोंद असल्यामुळे सदरची मिळकत वादी यांच्याकडून विक्री होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादीविरुध्द मनाई आदेश पारित करण्यात यावा. याउलट, वादी यांच्या कथन व युक्तीवादाप्रमाणे ते सन १९८५ पासून प्रतिवादी यांच्यापासून विभक्त रहात आहेत. त्यांनी स्वतःच्या सुतार काम व्यवसायातून गट क्र.२५५३ ही मिळकत खरेदी केली आहे. त्यामध्ये प्रतिवादींचा कोणताही हक्क व हिस्सा नाही. सदरची मिळकत वादी यांची स्वकष्टार्जित असल्याने त्यामध्ये प्रतिवादींचा हक्क व

हिस्सा नाही. त्यामुळे सदर मिळकतीबाबत प्रतिवादींच्या हक्कात कोणतीही दाद मंजूर करता येणार नाही.

**१३.** दोन्ही बाजूंची कथने विचारात घेता प्रतिवादी यांनी निशाणी क्र.२३ सोबत दाखल केलेली कागदपत्रे पाहिली असता असे निदर्शनास येते की, गट क्र.२५५३ या प्रतिदाव्यातील मिळकतीच्या ७/१२ उता–यास वादी मारुती यांच्या एकटयाच्या नांवाची नोंद झालेली आहे. त्याचप्रमाणे सदर मिळकतीचे खरेदीपत्र पाहिले असता दिनांक ३०.१०.१९९२ रोजी सदरची मिळकत वादी मारुती यांनी चंद्रकांत पवार यांच्याकडून खरेदी घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. पुढे असेही निदर्शनास येते की, प्रतिवादी यांनी वादी यांना गट क्र.२५५३ या मिळकतीसह दोन्ही दावा मिळकतींचे तुटक वाटप करुन देण्याची मागणी नोटीसद्वारे केली होती. सदर नोटीसीस वादी यांनी प्रतिवादी यांना उत्तर नोटीस पाठवून गट क्र.२५५३ ही मिळकत त्यांची स्वकष्टार्जित मिळकत असल्याचे कळविले आहे. त्याचप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे वडिल कै.यशवंत यांच्या कौटुंबिक शिधापत्रीकेवरुन वादी यांचे नांव दिनांक १४.०८.२००१ रोजी कमी करण्यात आल्याचे निदर्शनास येते. यासंदर्भात प्रतिवादी यांच्या युक्तीवादाप्रमाणे वादी यांचे नांव सन २००१ मध्ये शिधापत्रीकेवरुन कमी केले असल्यामुळे सन २००१ नंतर वादी हे विभक्त रहात आहेत. याउलट, वादी यांच्या युक्तीवादाप्रमाणे ते सन १९८५ पासून प्रतिवादी यांच्यापासून विभक्त रहात आहेत व त्यानंतर त्यांनी स्वकमाईतून सदरची मिळकत खरेदी केली आहे. यासंदर्भात वादी यांनी

निशाणी क्र.२७ सोबत दिनांक २५.०७.१९८३ ते दिनांक २७.०३.२००० पर्यंतच्या नोंदी असलेल्या सांगली अर्बन को–ऑप. बँक यांचेकडील बचत खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत सादर केली आहे.

**१४.** उपरोक्त सर्व कागदपत्रांचे अवलोकन करता असा निष्कर्ष निघतो की, गट क्र.२५५३ ही मिळकत वादी यांनी स्वकष्टातून खरेदी घेतली आहे की एकत्रीत कुटुंबाच्या असणा–या मिळकतीच्या उत्पन्नातून खरेदी घेतली आहे हे या क्षणी स्पष्ट होत नाही. दोन्ही बाजुंची कथने व प्रतिकथने विचारात घेता सदरची बाब दाव्याच्या चौकशीअंती व दोन्ही बाजूंचा पुरावा अभिलेख्यावर आल्यानंतर सिध्द् होणार आहे. वस्तुस्थितीप्रमाणे, प्रस्तुत दावा व प्रतिदावा हे वाटपासाठी दाखल केलेले आहेत. दोन्ही बाजूंचे पुरावे आल्यानंतर सदर मिळकतींमधील पक्षकरांचे कायदेशीर हक्क ठरणार आहेत. अशा परिस्थितीत, प्रतिदाव्यातील नमुद मिळकत गट क्र.२५५३ ही दाव्याच्या अंतिम निकालापावेतो संरक्षित करणे आवश्यक आहे. सदर मिळकतीस सध्या वादी यांच्या एकटयाच्या नांवाची नोंद असल्याचे दिसून येते. त्यामुळे गट क्र.२५५३ यामध्ये वादीकडून त्रयस्थ इसमाचे हक्क निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झाल्यास दाव्यामध्ये नाहक गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. सबब, उपरोक्त विश्लेषणांती असा निष्कर्ष निघतो की, प्रतिवादी यांच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा समतोल देखील प्रतिवादींच्या बाजूने आहे. जर वादी विरुध्द मनाई आदेश पारित केला नाही तर प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट, सदर मनाई

आदेशामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परिणामतः प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ यांचे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून प्रश्नबिंदू क्र.४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

२. वादी यांनी मौजे मालगांव येथील गट क्र.२५५३ ही मिळकत विल्हेविक्री अथवा अन्य मार्गे हस्तांतरित करु नये अथवा त्यावर बोजा निर्माण होईल असे कोणतेही व्यवहार करु नयेत अशी दाव्याच्या अंतिम निर्धारणापर्यंत तुर्तातूर्त मनाई देण्यात आली आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च हा दाव्याच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

सही/–

मिरज ( **वि.वि.खुळपे** )

दि. २५.१०.२०२३. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

**मिरज.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file, are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | K. A. Udagave |
| Court. | : | Civil Judge Junior Division and J.M.F.C. Miraj |
| Dictation Date | : | 25.10.2023 |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 25.10.2023 |
| Order uploaded on. | : | 26.10.2023 |